# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र. ४०१/२०१९    दिनांक  १८/११/२०१९**

**१)कुंटूर :-** दिनांक १५.११.२०१९ रोजी चे ०६.०० ते दि. १७.११.२०१९ चे १७.३० वा. चे दरम्यान, मौ. सावरखेडा तलाव ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे श्रीनिवास गोविंदराव शिंदे, वय १६ वर्षे, रा. रुई बु. ता. नायगाव जि. नांदेड** हा सावरखेड येथील आत्याकडे जातो म्हणुन गेला होता. त्याचे प्रेत सावरखेड शिवारातील तलावामध्ये मयत आवस्थेत मिळुन आले. वगैरे **खबर देणार धनराज दादाराव ढगे, वय ३० वर्षे, व्यवसाय शेती रा. घुंगराळा ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोस्टे कुंटूर आ. मृ. ३३/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/११८१ कुमरे, मो.क्र. ८२०८७८८३२४** हे करीत आहेत.

**२)मुखेड :-** दिनांक २४.०२.२०१८ ते आज पावेतो, मौ. आतनुर ता. जळकोट, ह. मु. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस माहेरहुन दहा लाख रुपये घेऊन ये म्हणुन मारहाण व शिवीगाळ करुन शारीरीक व मानसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी २४ वर्षीय महीला** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं.३४९/२०१९ कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि कायदा प्रमाणे गुन्हां दाखल असून **तपास पोना/२०४९ आंबेवार, मो.क्र. ८६०५२५२५५५** हे करीत आहेत.

**३)नांदेड ग्रामीण :-** दिनांक १५.११.२०१९ रोजी चे २३.३० वा. चे सुमारास, इंगेवाड पेट्रोलपंप सिडको, नांदेड ते नाईक कॉलेज दरम्यानच्या रोडवर सिडको नांदेड येथे, यातील फिर्यादी हा नेहमी प्रमाणे डयुटी करुन स्कवेअर मॉल कौठा येथुन घराकडे जात असतांना नमुद ठिकाणी फिर्यादीचे पाठीमागुन मो.सा. वर २०-२५ वर्षे वयोगटातील अज्ञात तीन आरोपीनी फिर्यादीस धरुन ओढल्याने फिर्यादी हा मो.सा. सह खाली पडला असता त्यातील एकाने फिर्यादीस दाबुन धरुन दुसऱ्याने हातातील लाकडाने डाव्या पायाचे मोडीवर, व डाव्या हातावर व उजव्या बाजुच्या टिचरावर मुक्का मार मारुन तिसऱ्या आरोपीने जवळील बॅग हिस्कावुन घेवुन नगदी ४२१०/-रु व खिशातील पॉकीटातील कार्ड व नगदी ५००/-रु व मो.सा. क्रं. एम.एच.-२६/बी.बी.-१११८ स्पेलेंडर प्लस किंमती अंदाजे ३५,०००/-रु ची असा एकुण ३९,७१०/-रु चा माल जबरीने काढुन घेऊन लातुर फाटयाकडे निघुन गेले. वगैरे **फिर्यादी गौतम पि. कोंडीबा चिंतोरे, वय ३२ वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी, रा. शाहुनगर वाघाळा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं ५६४/२०१९ कलम ३९४, ३४ भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/आर.एम. घोळवे, मो.क्रं. ८६०५४९५८०४** हे करीत आहेत.

**४)वजिराबाद :-** दिनांक १९.०७.२०१८ ते दि. १३.०८.२०१८ वा. चे दरम्यान, फायनान्स कॉ. ब्रँच बाफना रोड लक्झरी पॉईंटसमोर नांदेड येथे, यातील फिर्यादीची कार क्रमांक एम.एच.-१४/सी.एस.-२३४ ही फायनान्सची रक्कम पुर्ण भरणा केलेली असताना सुध्दा घरासमोर लावलेली कार यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन चोरुन नेली व फायनान्स कंपाणीची फसवणुक केली. वगैरे वरुन मा. न्यायालयाचे आदेशावरुन गुन्हा दाखल झाला आहे. **फिर्यादी जसविंदर कौर पि. मेजरसिंग राय, वय २७ वर्षे, व्यवसाय ट्रान्सपोर्टेशन रा. जुना कौठा बसवेश्वर नगरचे पाठीमागे गुरुद्वारा नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं ३६१/२०१९ कलम ३७९ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/बडे, मो.क्रं. ९८२३७२५८८३** हे करीत आहेत.

पोलीस अधिकक्षक कार्यालय,
नांदेड.